सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत

# क्विक हील फाउंडेशन व राजश्री शाहू महाविद्यालयाचा सायबर सुरक्षा उपक्रम

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ ऑगस्ट : वाढत्या डिजिटल वापराच्या पार्श्र्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा आणि डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने क्विक हील फाउंडेशन आणि राजश्री शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या पुढाकारातून, -झख अधिकारी भालचंद्र तिडके यांच्या विशेष सहकार्याने राज नारायण लाहोटी इंग्लिश स्कूल, लातूर येथे सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.



या सत्रात इयत्ता ५ वी ते ७ वीच्या ६०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या वयोगटाला अनुरूप आणि संवादात्मक पद्धतीने डिजिटल जगातील सुरक्षिततेचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. या उपक्रमात जाधव साहिल आणि कृष्णा पांढरे, राजश्री शाहू महाविद्यालयातील विद्यार्थी, यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत विविध महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन केले.

सत्रादरम्यान डिजिटल सेफ्टी, सायबर सिक्युरिटी, फिशिंग, मजबूत पासवर्ड, वैयक्तिक माहितीची सुरक्षितता आणि ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. फिशिंगच्या माध्यमातून होणाऱ्या ऑनलाइन फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, संशयास्पद लिंक व संदेशांपासून सावध का राहावे आणि मजबूत पासवर्डचा वापर का आवश्यक आहे, हे विद्यार्थ्यांना सोप्या उदाहरणांच्या माध्यमातून समजावून सांगण्यात आले.

-झख अधिकारी भालचंद्र तिडके यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना सायबर गुन्हेगारी आणि डिजिटल माध्यमांच्या सुरक्षित वापराबाबत अधिक प्रभावी मार्गदर्शन मिळाले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारत सत्रात सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांची जिज्ञासा आणि सकारात्मक प्रतिसाद यामुळे संपूर्ण सत्र अत्यंत संवादात्मक, ज्ञानवर्धक आणि प्रभावी ठरले.

आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानाचा वापर करताना सजगता, जबाबदारी आणि सुरक्षितता या तीनही बाबी महत्त्वाच्या आहेत. लहान वयापासूनच विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल सवयींची जाणीव करून देणे ही काळाची गरज आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश या उपक्रमातून देण्यात आला.